# MARATHI (LL)

## SOLUTION : PRACTICE ACTIVITY SHEET 5

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) लेखकाने या सामन्यात १०० धावा केल्या – आंतरशालेय सामन्यात

(ii) वर्गात लेखकाच्या तोंडून नकळत आलेले उद्‍गार – हाऊज दॅट?

**(2)** (i) ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेसची मॅच पाहण्यासाठी आत जाण्याचे मार्ग बंद होते; कारण सामन्याला तिकीट होते व मैदानावर गोलाकार कनात घालण्यात आली होती.

(ii) वर्गात गणिताच्या तासाला वहीची अनेक पाने लेखकाच्या स्वाक्षरीने भरू लागली; कारण आपण मोठे खेळाडू झालो, तर स्वाक्षरीसाठी अशीच गर्दी होईल, हे स्वप्न लेखक पाहत होते.

**(3)** लहानपणी लेखक घरात जळणासाठी आणलेल्या लाकडातून बॅट व स्टंप तयार करीत असत, म्हणजे लहानपणापासून त्यांना क्रिकेटची आवड होती. नंतर लेखक चुलत्यांकडे वाय. एम. सी. ए. च्या कंपाऊंडमध्ये राहत, तेव्हा शाळा सुटल्यावर ते धावत धावत ग्राऊंडवर जात. यावरून त्यांना खेळाची ओढ होती, हे कळते. तिथे ते बॉल टाकण्याचे काम करीत, त्यातून त्यांना उत्तेजन मिळाले. ते ग्राऊंडसमनलाही मदत करीत. वडील पुण्यात आल्यावर वडिलांनी लेखकांना जुनी बॅट आणून दिली, तेव्हा लेखकांना अत्यंत आनंद झाला. नंतर एकदा पूना क्लबच्या ग्राऊंडवर ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेस व वाय. एम. सी. ए. या दोन संघांदरम्यान जो क्रिकेट सामना झाला, तो लेखकांनी झाडावर चढून पाहिला. सामन्यानंतर खेळाडूंच्या सहीसाठी जी झुंबड उडाली ती लेखकांनी पाहिली. तेव्हा त्यांना वाटायला लागले की, आपण असे मोठे खेळाडू झालो तर आपल्यामागेही सहीसाठी गर्दी होईल. वर्गात लेखक क्रिकेटची स्वप्ने पाहू लागले. यातूनच लेखकांच्या मनात क्रिकेटचे बीज रुजले गेले आणि उगवले.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) सभा, संमेलने गाजवणारे कवी – नारायण सुर्वे

(ii) २००४ च्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष – रा. ग. जाधव

**(2)** (i) शालींच्या वर्षावामुळे नारायण सुर्वे यांची शालीनता हरवली नाही; कारण सुर्वे मुळातच शालीन होते.

(ii) लेखकांच्या मते, शालीमुळे शालीनता जाते; कारण सन्मान करण्याच्या रूपाने आपण एक शालीन जग गमावून बसण्याचा धोकाच मोठा आहे.

**(3)** लेखकाने एक म्हातारा भिक्षेकरी ओंकारेश्वराच्या पुलावर थंडीने कुडकुडताना पाहिला. लेखकांच्या मनात करुणा जागृत झाली. त्यांनी त्या भिक्षेकऱ्याला आपल्याकडील दोन शाली दिल्या. आपण परोपकार केल्याच्या भावनेत लेखक तृप्त होते. परंतु आणखी चार-पाच दिवसांनी लेखकांनी पाहिले की, तो म्हातारा भिक्षेकरी अंगावर चिरगुटे घेऊन पूर्वीसारखाच बसला आहे. कुतूहलाने लेखकांनी त्याला शालीबद्दल विचारले. तेव्हा भिक्षेकऱ्याने सांगितले की, त्याने त्या शाली विकल्या आणि दोन दिवस पोटभर खाल्ले. 'शालीच्या शोभेपेक्षा पोटाची आग फार वाईट' हे त्याचे म्हणणे योग्य होते. त्याच्या अंगावर शाल पाहून त्याला कुणीही भिक्षा दिली नसती. त्यामुळे त्याला अन्नही मिळाले नसते. यावरून गरिबाला शालीचा उपयोग नसतो, उलट ती त्याची अडचण असू शकते, असे म्हाताऱ्या भिक्षेकऱ्याला सुचवायचे आहे.

**प्र. 1. (इ)**

**(1)** **न्यूटनला पडलेले प्रश्न**

- सफरचंद झाडावरून खाली का पडले?
- ते वर का नाही गेले?

**(2)** (i) रामकृष्ण परमहंस

(ii) गुरुत्वाकर्षण

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) झाड

(ii) दवाचे टपोरे थेंब

**(2)** **झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी**

- शरीरभर हिरवा रंग विरघळतो.
- रक्त क्षणभर हिरवेगार होते.

**(3)** (i) नवरी – वधू

(ii) मुसाफिर – प्रवासी

(iii) संथ – सावकाश

(iv) ऋषी – मुनी/साधू.

**(4)** 'हिरवंगार झाडासारखं' या कवितेत कवी जॉर्ज लोपीस सांगतात की, माणसाचे आयुष्य झाडासारखे व्हायला पाहिजे.

'झाड' हा निसर्गाचा एक घटक आहे. झाड सहनशील असते. ते परोपकारी असते. झाड नि:स्वार्थपणे माणसाला पाने, फुले, फळे देते. गाईगुरांसाठी, वाटसरूंसाठी दाट सावली देते. पशुपक्ष्यांना निवारा आणि माणसांना निवाऱ्यासाठी लाकूड देते. औषधेही देते. त्याला निर्दयीपणे तोडणाऱ्या माणसाला ते दुखावत नाही; तर ते सहनशील राहून वेदना सोसते. झाडाचे हे सर्व सद्गुण माणसाने अंगिकारायला हवेत. पानगळीनंतर पालवी फुटलेले झाड माणसाच्या आयुष्याला प्रेरणा देते. म्हणूनच 'जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं' या पंक्तीतून 'माणसाने आपले आयुष्य झाडासारखे जगावे' हा बहुमोल संदेश कवी देतात.

**प्र. 2. (आ) कविता –** दोन दिवस

(1) **प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ नारायण सुर्वे.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ कामगाराच्या आयुष्यातील वास्तव परिस्थितीचे चित्रण.

(3) **प्रस्तुत कवितेतील दोन ओळींचा सरळ अर्थ** ⟶ कारखान्याच्या झोतभट्टीत जसे पोलाद शेकते, तसे मी माझे आयुष्य शेकवून घेतले. बऱ्यावाईट प्रसंगाच्या आगीतून मी बाहेर निघालो. चार दिवसांचे छोटेसे आयुष्य जगताना दोन दिवस सुखाची वाट पाहण्यात खर्ची घातले नि उरलेले दोन दिवस दु:खात काढले.

(4) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** ⟶ थेट शब्दकळेतून कामगारविश्वाचे दाहक चित्रण केल्यामुळे कविता मनाला भिडते. कामगार जीवनाच्या खडतरपणाचा प्रत्यय अनुभवता येतो. कामगार जीवनाविषयी सहृदयता जागृत होते. जीवन समजून घेण्याची ओढ निर्माण होते. अशी प्रगल्भ जाणीव मनात निर्माण करणारी ही कविता आवडली.

(5) **कवितेतील शब्दांचे अर्थ** – (i) डोई – डोके (ii) दुनिया – जग

(iii) रात्र – रजनी (iv) पोलाद – लोखंड

**किंवा**

**कविता** – स्वप्न करू साकार

(1) **प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ किशोर पाठक.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या कवितेत रेखाटले आहे.

(3) **प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ** ⟶ आम्ही भारतीय हजारो-लाखोंच्या संख्येने असलो, तरी आमची एकजूट मजबूत आहे. सर्वांची ताकद एकाच मनगटात आहे.

(4) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** ⟶ या देशभक्तीपर गीतात नव्या पिढीचे व नव्या युगाचे स्वप्न साकार करण्यासाठी कवींनी मार्गदर्शन केले आहे. हे करताना कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचा पुरस्कार केला आहे. नवीन पिढीसाठी नवी स्वप्ने साकार करण्याचा विचार मांडणारी ही कविता मला आवडली.

(5) **कवितेतील शब्दांचे अर्थ** – (i) धन – संपत्ती/दौलत (ii) एकी – एकता/एकजूट

(iii) श्रम – मेहनत (iv) मंत्र – श्लोक/घोष

**प्र. 3.**

**(1) सूर्य** : चला, माझी मावळायची वेळ झाली. पण एक चिंता लागून राहिलेय की माझ्यानंतर या धरतीला कोण उजळेल?

**पणती** : प्रणाम, सूर्य देवा!

**सूर्य** : कोण गं तू?

**पणती** : मी पणती आहे.

**सूर्य** : इथे कशी तू?

**पणती** : तुमचं बोलणं ऐकलं नि धावत आले.

**सूर्य** : काय काम आहे का माझ्याकडे?

**पणती** : माझं काहीच काम नाही. उरलेलं तुमचं काम मला करायचं आहे! करू का?

**सूर्य** : काय करणार गं तू?

**पणती** : तुम्ही गेल्यावर या धरतीला मी उजळत ठेवीन.

**सूर्य** : खरं की काय? तुझा प्रकाश तो केवढा!

**पणती** : चिमुकला असला तरी प्रकाशच ना? तुमचाच वसा घेतलाय मी. स्वत: जळत दुसऱ्यांना उजेड देणे हे कर्तव्य मानते मी!

**सूर्य** : होय ग, बाळे! आज मी धन्य झालो. माझा आशीर्वाद आहे तुला!

**पणती** : चरणस्पर्श करते बाबा तुम्हांला!

**(2)** समर्थ रामदासांचे असे सुवचन आहे की 'आधी केले, मग सांगितले!' यातून फार मोठा मोलाचा संदेश संत रामदासांनी दिला आहे. आपल्याला एक भारी वाईट सवय असते, ती म्हणजे आपली कामे दुसऱ्यांनी करावीत. आपल्या आळशी प्रवृत्तीतून 'देरे हरी। खाटल्यावरी।' अशी भावना तयार होणे गैर आहे. आपण परावलंबी न होता, स्वत:ची कामे स्वत: करण्याची धमक आपल्यात असायला हवी. आपण स्वत: आपली कामे करण्यात सक्षम असलो की, आपण आपले उदाहरण दुसऱ्यांना दाखवू शकतो. स्वावलंबी होऊन आपली कामे आपण केली की दुसऱ्यांनाही विश्वास वाटतो. मग आपण दुसऱ्यांसाठी आदर्श होतो. यालाच 'आधी केले, मग सांगितले' असे म्हणतात.

**(3)** वाळवंटी प्रदेशातील अनेक कॅक्टस सरळसोट खांबासारखे उंच वाढतात. त्यांच्या अंगावर धारदार बोचरे काटे पसरलेले असतात. त्यामुळे कोणताही प्राणी त्यांना तोंड लावू शकत नाही. काटे म्हणजे कॅक्टसचे संकटकाळी स्वत:च केलेले संरक्षण असते. वाळवंटी प्रदेशातील बहुतेक झाडांना काटे असतात. त्याला विशेष कारण असे की, ओल्या प्रदेशातही काटेरी झाडे प्राण्यांनी खाल्ली, तरी पाण्याची कमतरता असूनही ही झाडे पुन्हा लवकर उगवून येतात. वाळवंटी प्रदेशात हे शक्य नसते. पाण्याच्या दुष्काळामुळे झाड सुकून जाते. यासाठी वाळवंटी प्रदेशातील झाडांनी जणू काट्याची हत्यारे स्वसंरक्षणासाठी धार लावून ठेवली आहेत.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (1) विधानार्थी वाक्य

(2) आज्ञार्थी वाक्य

**(2)** (1) होकारार्थी वाक्य – वर्गातील काही मुलांना हे उदाहरण समजलेले आहे.

(2) प्रश्नार्थी वाक्य – तुला कशासाठी पैसे हवेत?

**(3)** (1) खूणगाठ बांधणे – **अर्थ :** निश्चय करणे.

**वाक्य :** आपल्या चित्रांचे प्रदर्शन भरवायचेच, अशी वृषालीने <u>खूणगाठ बांधली.</u>

(2) राबता असणे – **अर्थ :** सतत ये-जा असणे.

**वाक्य :** माझ्या लहानपणी माझ्या आजोबांकडे निळ्या बंगल्यात लोकांचा <u>राबता असे.</u>

(3) हातभार लावणे – **अर्थ :** मदत करणे.

**वाक्य :** कुंभारीमध्ये मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सर्वच गावकऱ्यांनी <u>हातभार लावला.</u>

**प्र. 4. (आ)**

**(1)** **(i)** (1) पुरस्कार = बक्षीस

(2) पाहुणा = अतिथी

**(ii)** (1) लक्ष × दुर्लक्ष

(2) स्तुती × निंदा

**(iii)** नृत्य करणारा – नर्तक

**(iv)** (1) गोठा – गोठे

(2) नद्या – नदी

**(2)** (1) त्यांच्या खाजगी उपोषणाची कहाणी चाळीत सर्वत्र गाजली.

(2) तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले.

**(3)** (1) आनंदी, खेळकर मुले सर्वांना आवडतात.

(2) ''काका, हे शास्त्रीय सत्य आहे.''

**प्र. 5. (अ), (आ) व (इ) ...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

***उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी***

***'नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***